विषेश दिवाणी दावा.क्रं.१९१/२०११ मधील नि.५ वरील आदेश

श्री.रऊफ हसन डोलारे
व इतर .... वादी
वि.
श्रीम.खातुनबी इस्माईल नावडेकर
व इतर .... प्रतिवादी

वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तूर्तातूर्त मनाईहुकूम मिळणेकरीता खालील मुद्दयांचे आधारे हा अर्ज केला आहे-

२) इस्माईल अब्दुल रहेमान नावडेकर यांचे मालकीची मौजे नागझरी, ता.पनवेल, जिल्हा रायगड येथे गट क्रं.१३/१, हिस्सा क्रं.१ ही मिळकत आहे. तसेच, त्यांचे मालकीची घर क्रं.३२०-सी ही मिळकत आहे. तसेच मौजे करंजाडे, ता.पनवेल, जिल्हा रायगड येथील स.क्रं.१०२ हि.क्रं.१ ब व स.क्रं.१०२ अे, हि.क्रं. १ बी, या देखील त्यांचे मालकीच्या मिळकती आहेत. त्या संपादीत झाल्या आहेत. त्यानी वाढीव नुकसानभरपाई मिळणेकरीता निर्देश दाखल केले होते. सदरची वाढीव नुकसानभरपाईची रक्कम स्विकारणेपूर्वी इस्माईल नावडेकर मयत झाल्याने त्याना मुलबाळ नाही म्हणून प्रतिवादी क्रं.१, त्यांची पत्नी व २ बहीणी त्याना कायदेशीर वारस आहेत. मयत इस्माईल यांचे भाऊ त्यांचेपूर्वीच मयत झाले आहेत. परंतू प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी संगनमत करून बेकायदेशीरपणे कोर्टातून रक्कम रू.९,७७,३१९/- काढली आहे. दुस-या निर्देशातील रक्कम रू.७,६४,८२५/- अलिबाग कोर्टात जमा आहे. म्हणजेच तिचे हिश्यापेक्षा जास्त रक्कम तिने काढली आहे. वादी पुढे नमूद करतात की, संपादीत जमीनीचे बदल्यात मयत इस्माईल याना करजांडे, ता.पनवेल, जिल्हा रायगड, सेक्टर- ४, भूखंड क्रं.१९ वाटप झाला आहे. (यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येईल) मयत इस्माईल यांच्या बहीणी शरीफा व हवाबी या मयत झाले असून त्यांची मुले कायदेशीर वारस अहेत. प्रतिवादी क्रं.२ हा मयत इस्माईल यांचा वारस नाही. त्याचेशिवाय मयताचे इतर पुतणे आहेत. परंतू त्यानी वारस आहेत असे दाखूवन खोटा चौकशी अर्ज क्रं.१९१/९५ नुसार प्राप्त केला आहे. प्रतिवादी क्रं.२ ने बेकायदेशीरपणे प्रतिवादी क्रं.१ याना स.क्रं.१३/१ ही मिळकत विक्री केली आहे व

प्रतिवादी क्रं.२ ने प्रतिवादी क्रं.३ ला विक्री केली आहे. प्रतिवादी क्रं.२ यानी प्रतिवादी क्रं.१ ला कोणताही मोबदला दिला नाही. तसेच, तिने घर क्रं.३२०-सी प्रतिवादी क्रं.२ चे नावे विना मोबदला हस्तांतरीत केला आहे. वादीना असे समजले की, प्रतिवादी क्रं.१ व २ दावा मिळकत त्यांचे नावे करून घेणार आहेत. तसेच, प्रतिवादी क्रं.१, २ व ३ घर व जमीन ति-हाई त इसमांना विकण्याची शक्यता आहे. म्हणून प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी दावा मिळकत तसेच घर मिळकत ति-हाईत इसमास विकू नये व एल ए आर क्रं.६४७/१९८७ मध्ये जमा असलेली रक्कम काढून घेउ नये अथवा प्रतिवादी क्रं.३ ने स.क्रं.१३/१ इतर कोणाला विकू नये. तसेच प्रतिवादी क्रं.४ व ५ यांनी दावा मिळकत कोणालाही हस्तांतरीत करू नये, असा मनाईहुकूम मिळणेची विनंती केली आहे.

३) प्रतिवादी क्रं.१ ने नि.४६ प्रमाणे जबाब दिला. दावा मिळकती व इतर मिळकती इस्माईल यांचे मालकीच्या आहेत हे या प्रतिवादीने नाकारले आहे. सदर मिळकत दिनांक २५/०६/२००७ पासून प्रतिवादी क्रं.३ चे मालकीची आहे. दाव्यातील मिळकतीशी अथवा दावा मिळकतीशी वादीचा कोणताही हक्क, हितसंबंध नाही. मयत इस्माईल यांना प्रतिवादी क्रं.१ व २ खेरीज कोणीही वारस नाहीत. शरीफा व हवाबी या मयत इस्माईल यांच्या बहीणी नाहीत. तसेच, वादी त्यांचे वारस नाहीत. प्रतिवादी क्रं.१ व २ हे मयत इस्माईल यांचे वारस असलेबाबत कोर्टाने वारस दाखला मंजूर केला आहे. त्यावेळी शरीफा व हवाबी यानी कोणतीही हरकत उपस्थित केली नव्हती. जमीनीचे व्यवहारामध्ये प्रतिवादी क्रं.१ ला मोबदला मिळालेला नाही. हे त्यानी नाकारले आहे. घर क्रं ३२०-सी प्रतिवादी क्रं.१ चे मालकीचे होते. वादीचा दावा मुदतीत नाही. वादीनी अलिबाग कोर्टात दिवाणी चौकशी अर्ज क्रं.०७/२००८ व ना. कोर्टात दिवाणी चौकशी अर्ज क्रं. ६४१/२००८ चे प्रकरण वारस दाखला मिळणेकामी दाखल केले होते ही बाब त्यांनी दडवून ठेवली आहे. मनाईहुकूम नाकारलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीना दावा मिळकतीमध्ये कोणताही हिस्सा नाही त्यामुळे ती वाटप करता येणार नाही. सबब, अर्ज रद्द करणेची विनंती केली आहे.

४) प्रतिवादी क्र.२ ने नि.२० प्रमाणे अर्जास जबाब दाखल केला आहे. त्याने अर्जदार क्रं.१ चे म्हणणे स्विकारले आहे.

५) प्रतिवादी क्रं.३ विरूध्द विना कैफियतीचा आदेश करण्यात आला आहे.

६) प्रतिवादी क्रं.४ ते ६ यांनी नि.५९ प्रमाणे म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणे एम आर टी पी कायदयाप्रमाणे वादीने पूर्व नोटीसशिवाय दावा दाखल केला आहे. त्यांचे निवाडा क्रं.९२ प्रमाणे मयत इस्माईल नावडेकर हे मौजे करंजाडे येथील मिळकतीचे मालक होते. त्यांची जागा संपादीत करण्यात येउन त्याबदल्यात त्याना १७५० चौ मी चा भूखंड म्हणजेच दावा मिळकत इरादीत करण्यात आली होती, परंतू अदयाप सदर भूखंड त्याना वाटप करण्यात आलेला नाही. त्यामुळे दावा अपरिपक्व (premature) आहे. वादीने कोणताही वारसदाखला त्यांचेकडे दिलेला नाही. त्यामुळे त्याना मनाईहुकूम मागता येणार नाही. सबब अर्ज रदद् करणेची विनंती केली आहे.

७) वादी व प्रतिवादींची कथने लक्षात घेता, हया अर्जाचे निकालासाठी खालील मुद्दे माझे विचाराधीन आले. त्या प्रत्येक मुदयावरील माझा निष्कर्ष व त्याबद्दची कारणमिमांसा पुढे दिली आहे-

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| १) वादीने त्याचेकडे प्रथमदर्शनी सबळ केस असल्याचे शाबीत केले काय? | नाही. |
| २) सोयीचा तराजू वादीचे बाजूने झुकल्याचे त्याने शाबीत केले काय? | नाही. |
| ३) वादीचे लाभात मनाईहुकूम न दिल्यास त्याचे अपरिमित नुकसान होत असल्याचे वादीने शाबीत केले काय? | नाही. |
| ४) हुकूम काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

८) दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्रं.१ व २ बाबत** :-

९) प्रतिवादी क्रं.२ ने वादीने दाखल केलेला दिवाणी चौकशी क्रमांक ६४१/२००८ ची नि.१, सामनेवालाने दाखल केलेला जबाब व रोजनाम्याची प्रत दाखल केली आहे. प्रतिवादीने अलिबाग येथील कोर्टात किरकोळ अर्ज क्रं.०७/२००८ चे नि.१ ची प्रत व वादीने सिडकोला दिलेल्या दिनांक ०३/०८/२००९ रोजीची नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यानुसार इस्माईल नावडेकर यांचे वारस खातूनबीबी नावडेकर याना रू.७,६४,८२५/- देण्याचा आदेश करण्यात आला आहे. सदर अर्जास श्रीम.सुरय्या शौकत कर्णेकर यानी हरकत घेतली होती. सदर अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

१०) वादीने मयत इस्माईल यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. रोजनाम्यानुसार अर्जदार गैरहरज असलेमुळे सदर अर्ज गैरहजेरीमुळे खारीज करण्यात आला आहे. वादीने हक्काचे पत्रक म्हणजेच फेरफार नोंद क्रं.१०४९ दाखल केली आहे. त्यामध्ये इब्राहीम मयत झालेवरून त्यांची मुले व मुली वारस असल्याची नोंद दाखल केली आहे.

११) दावा मिळकती मयत इस्माईल नावडेकर यांचे नावावर असलेबाबत फेरफार क्रं.१८७ दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांचे मृत्यूनंतर पत्नी खातूनबीबी यांचे नाव लावलेचा फेरफार क्रं.३५१ दाखल केला आहे. वादीने निवाडयाची प्रत, कब्जेपावतीची सही शिक्याची नक्कल, एल ए आर क्रं.६४७/७६, प्रतिवादी क्रं.१ व २ यानी दि.चौ.अर्ज क्रं.१९१/९५ अन्वये वारसदाखला घेतलेचा आदेश, दिनांक २७/११/१९९७ रोजीचे खरेदीखताची नक्कल, दिनांक ०३/०१/२०११ रोजीची नोटीस, इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१२) वादीचे वकीलानी नमूद केले की अदयाप भूखंड वाटप झालेला नाही. मयत इस्माईल यांच्या दोन बहीणी ते हयात असताना जिवंत होत्या त्यामुळे वादी त्यांचे वारस आहेत. प्रतिवादी कं.२ चे वडील इस्माईल यांचे पूर्वीच मयत झालेमुळे प्रतिवादी कं.२ वारस होउ शकत नाही. जर प्रतिवादी कं.२ हा इब्राहीम यांचा वारस असेल तर त्याचे इतर भाउ मयत इस्माईल यांचे वारस ठरतील. जर तो इस्माईल यांचा वारस आहे तर त्याने एक मिळकत प्रतिवादी कं.१ कडून विकत घेण्याचे कोणतेही कारण नव्हते. वादींची आई इस्माईल यांची बहीण होती किंवा नाही याकरीता पुरावा देण्याची आवश्यकता आहे. जरी वादी इस्माईल यांचे वारस ठरले नाही तरी प्रतिवादी कं.१ इस्माईल यांचा पुर्ण हिस्सा मिळणेस पात्र नाही. तिला केवळ १/४ हिस्सा मिळेल व बाकी वक्फ बोर्डाकिडे जाईल. वारस ठरणेकरीता ते केव्हाही दावा दाखल करू शकतात. वादीने मुस्लीम धर्मात कशा प्रध्दतीने हिस्से दिले जातात याचा तक्ता दाखल केला आहे. सुन्नी कायदयानुसार मयताचे विधवेस १/४, आईला १/३ व सख्या बहीणीला अर्धा हिस्सा मिळतो. त्यानी पुढील सारतत्वांचा आधार घेतला-

१ Mir Isub Mir Inus Maldikar Vs. Isub (1920) 22 BOMLR 942, wherein it was observed that-

> "Mohomedan dying leaving a widow as his sole heir, he says, "the widow will take one forth as sharer, and the remaining three fourths by "Return". The surplus three fourths does not escheat to the Government."

१३) प्रतिवादी कं.१ व २ यांचे वकीलांनी युक्तिवाद केला की, जो पक्षकार मागण्या करतो त्याला त्याची मागणी सिध्द करणे आवश्यक आहे. वादीने दावा दाखल करतानाच ते वारस आहेत हे दाखविण्याकरीता आवश्यक कागदपत्र दाखल करणे जरूरीचे होते परंतू वादीने तसा कोणताही दस्त दाखल केला नाही.

प्रतिवादी क्रं.१ याना केवळ १/४ हिस्सा मिळणार नाही. वादीने दावा नोटीस दिलेनंतर ६ महिन्यापर्यंत दाखल केला नाही व कोर्टाची फसवणूक केली आहे. त्याचे वागणूकीवरून त्याना मनाईहूकूम मिळणेचा अधिकार नाही. इस्माईल सन १९८८ मध्ये मयत झालेनंतर वारसाहक्काचा प्रश्न उदभवला. परंतू त्यानंतर त्याच्या तथाकथीत बहीणींनी कोणताही हक्क सांगितला नाही. वादीची आई निर्देशामध्ये देखील त्यांचे वारस म्हणून सामील झाली नव्हती. वादीने दाखल केलेला वारसदाखल्याचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे. वादींची वागणूक पहाणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रं.३ याचा मिळकतीशी संबंध नाही.

१४) प्रतिवादीने मोमेडन कायदयाप्रमाणे हक्क कसे हस्तांतरीत होतात यासंबंधीचे नियम दाखल केले आहेत.

१५) वादीने हवाबी इस्माईल मजीद दिनांक २१/०१/१९९९ व शरीफा दिनांक ३०/०५/२००८ रोजी मयत झालेबाबतचे मृत्यू दाखले, प्रतिवादी क्रं.१ व २ यांचे दरम्यान झालेली खरेदीखताची प्रत दाखल केली आहे. तसेच एल ए आर क्रं.६४७/८७ दाखल केला आहे. दाव्यात नमूद केलेल्या मिळकती इस्माईल यांचे मालकीची आहे हे प्रतिवादीने मान्य केले आहे त्यामुळे त्यासंबंधी कोणताही वाद नाही. इस्माईल सन १९८८ मये मयत झाले आहेत. तसेच एका मिळकतीचा निवाडा संपादीत होउन इस्माईलचे नावे झालेला आहे, ही बाब देखील दोन्ही पक्षकाराना मान्य आहे. तसेच, प्रतिवादी क्रं.१ ही इस्माईल यांची पत्नी आहे हे सर्व पक्षकारांना मान्य आहे. यावरून इस्माईलचे मृत्यूनंतर त्याचे वारस कोण याबाबत वाद आहे.

१६) करंजाडे येथील मिळकत संपादीत झालेनंतर वाढीव नुकसानभरपाई मिळणेकरीता इस्माईल यानी निर्देश क्रं.७४७/८७ दाखल केला आहे. सदर निर्देश प्रलंबित असताना त्यांचे निधन झालेमुळे त्याचे वारस म्हणून प्रतिवादी क्रं. १ त्यांची पत्नी रेकॉर्डवर घेतली. सदर निर्देशामध्ये जमा केलेल्या वाढीव नुकसानभरपाईची रक्कमेकरीता प्रतिवादी क्रं.१ ने किरकोळ अर्ज दाखल केला

आहे. त्यास यातील वादीने हरकत घेतली होती. सदर अर्ज व त्यामधील आदेशाची प्रत प्रतिवादीने दाखल केली आहे. त्यांची हरकत विचारात घेउन प्रतिवादी क्रं.१ चा अर्ज मंजूर करण्यात आला. प्रतिवादीने वादीना वारस दाखला मिळणेकरीता चौ.अर्ज क्रं.६४१/२००८ ची प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये देखील प्रतिवादी क्रं.१ यानी हरकत उपस्थित केली होती. सदर अर्जाचे कामी त्यामधील अर्जदार म्हणजेच प्रस्तूत वादी गैरहजर राहिल्याने तो निकाली काढण्यात आला.

१७) प्रतिवादी क्रं.१ इस्माईलची पत्नी आहे ही बाब वादीना मान्य आहे. संपूर्ण नुकसानभरपाईची रक्कम तिने घेतलेली आहे. एल ए आर क्रं.६४७/८७ मध्ये जमा असलेली रक्कम तिने काढून घेउ नये अशा प्रकारचा मनाईहुकूम या कोर्टाला देता येणार नाही. दावा मिळकतीचा भूखंड अदयाप वाटप झालेला नाही तसेच, घर क्रं.३२० सी हा या पूर्वीच प्रतिवादी क्रं.१ ने हस्तांतरीत केला आहे. त्यामुळे मनाईहुकूम न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दावा वादीने ते मयम शरीफा व हवाबी यांचे वारस असलेचे नमूद केले आहे. परंतू त्याबाबत कोणताही दस्त दाखल केला नाही. शरीफा व हवाबी मयत इस्माईल यांचे बहीणी असलेबाबतचा कोणताही दस्त दाखल केला नाही. याशिवाय मयत इस्माईल यानी दाखल केलेल्या निर्देशामध्ये त्या सामील झालेल्या नाहीत. प्रतिवादी क्रं.१ व २ यानी मिळविलेला वारस दाखला दि चौ अर्ज क्रं.१९१/९५ मध्ये दाखल केला आहे. सदर वारसदाखला देण्यात आला त्यावेळी म्हणजेच दिनांक ०६/०९/१९९५ रोजी हवाबी व शरीफा दोघी हयात होत्या, असे मृत्यूदाखल्यावरून दिसून येते सदर अर्जात देखील त्यानी कोणतीही हरकत घेतली नव्हती. म्हणजेच हवाबी व शरीफाबी यानी त्यांचे हयातीत त्या इस्माईल याचे वारस आहेत यासंदर्भात कोणतीही पावले उचलली नव्हती. अशा परिस्थितीत जर त्या इस्माईल यांचे वारस आहेत असे वादीचे म्हणणे आहे तर त्याबाबतीतला कोणताही पुरावा दाखल करणे आवश्यक होते. वरील सर्व बाबींचा विचार करता वादीने त्याना प्रथमदर्शनी केस आहे व सोयीचा समतोल त्यांचे लाभात आहे, असे सिध्द केले नाही. सबब, मुद्दा क्रं.१ व २ वरील निष्कर्ष नकारार्थी आहे.

**मुद्दा क्रं.३ बाबत** :-

१८) सन १९९७ मध्ये मौजे नागझरी येथील जमीन क्रं.१३/१ प्रतिवादी क्रं.१ ने २ ला विकली आहे व त्यानंतर प्रतिवादी २ ने प्रतिवादी क्रं.३ ला २००७ मध्ये विकली आहे. अशा परिस्थितीत, प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होईल. प्रतिवादींविरूध्द मनाईहुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार असल्याची बाब वादी शाबीत करू शकले नाहीत. म्हणून मुद्दा क्रं.३ वरील निष्कर्ष नकारार्थी दिला आहे.

**मुद्दा क्रं.४ बाबत** :-

१९) मुद्दा क्रं.१ ते ३ वरील निष्कर्ष लक्षात घेता वादीचा अर्ज नामंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे-

**आदेश**

अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

पनवेल
तारीख: १७/०४/२०१५

(चित्रा हंकारे)
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल.